सोमवार दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी मध्यवर्ती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे सकाळी ११.०० वाजता मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त.

सभेस खालीलप्रमाणे अधिकारी/ सभासद/ उद्योजक उपस्थित होते.
मा.श्री.जलज शर्मा,भा.प्र.से., जिल्हाधिकारी, नाशिक.
श्री.संदीप पाटील महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.
श्री. भिवा लवटे, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, नाशिक.
श्री.जगदीश पाटील, उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, नाशिक.
श्री.लि.ज.येळवे, कृषी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, नाशिक.
श्री.महेश भंजन, मुख्य कार्यकारी अधिकारी, HALCON, ओझर, नाशिक
श्री.ललित पवार, उपायुक्त, स्टेट जीएसटी, नाशिक
श्री.गोंविंद झा, कार्यकारी सदस्य, नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु. असोसिएशन (निमा), नाशिक.
श्री.जगन्नाथ खापरे, अध्यक्ष, Grape Exporters Association of India, नाशिक
श्री.रमेश पवार, अध्यक्ष, नाशिक जिल्हा उद्योजक व निर्यातदार संघटना, नाशिक.
श्री.जगदीश पाटील, आयमा एक्सपोर्ट कमिटी, नाशिक
श्री.मयंक तंडन, उद्योजक, फ्रेशटॉप फ्रुटस्, नाशिक
श्री.राजाराम सांगळे, उद्योजक, मे.सांगळे ॲग्रो फार्म, नाशिक
श्री.प्रितम चंद्रात्रे, उद्योजक, मे.पी.सी.फुडस्, नाशिक
श्री.मन्वेश चेचाणी, उद्योजक, मे.कालिया एक्सपोर्टस्, नाशिक
श्री.सुरज जाधव, ई अँड वाय टिम सल्लागार, नाशिक
एस.एम.महाजन, उद्योग अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्र,नाशिक.

सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून मा.जिल्हाधिकारी यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली व सभेचा उद्देश विषद केला.

नाशिक जिल्ह्यातील निर्यात वाढ होण्याच्या दृष्टीने उद्योजकांना येणा-या अडीअडचणी सभेत मांडण्याविषयी मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

नाशिक जिल्ह्यात द्राक्ष लागवडीकरीता पोषक हवामान असल्यामुळे निर्यात होवू शकतील असे नवीन प्रकारची द्राक्ष लागवड करावी असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले. त्याकरीता नाशिक द्राक्ष संशोधन केंद्राची आवश्यकता असल्याचे श्री.जगन्नाथ खापरे, अध्यक्ष, ग्रेप्स एक्सपोर्टस् असोसिएशन, नाशिक यांनी मत मांडले. केंद्र शासनाची रोडटेप या योजनेंतर्गत असलेल्या अनुदानाच्या टक्केवारीत वाढ करण्यात यावी अशी मागणी केली.

पॅकींग हाऊसेसचे अत्याधुनिक यंत्रसामुग्रीद्वारे नुतनीकरणासाठी केंद्र शासनामार्फत व ॲपेडा मार्फत अनुदान योजना होती ती सद्यस्थितीत बंद झालेली आले. तसेच अन्न प्रक्रिया मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत सुरू असलेली अनुदानाची योजना बंद आहे. सदरची योजना सुरू करण्याकरीता प्रयत्न करण्यात यावेत अशी मागणी उपस्थित निर्यातदार घटकांचे प्रतिनिधींनी सभेत केली. नाशिक जिल्ह्यात पुर्वी अस्तित्वात असलेल्या पॅकींग हाऊस व्यतिरिक्त अजून ३० पॅकींग हाऊसची आवश्यकता असल्याचे संचालक, नाशिक जिल्हा द्राक्ष बागायतदार संघ, नशिक यांनी सांगितले.

कोल्ड स्टोरेज व पॅकींग हाऊसकरीता आवश्यक असलेल्या जमीनीचे अकृषिक प्रयोजन वगळण्यात यावे, तसेच अखंडीत विद्यूत पुरवठा सुविधा मिळणेकरीता आवश्यक त्या उपाययोजा कराव्यात आणि कोल्ड स्टोरेज चालविण्याच्या दृष्टीने सोलर सिस्टिम बसविणेकरीता शासनामार्फत अनुदान देण्यात यावे अशी मागणी उपस्थित निर्यातदार उद्योजकांनी सभेत केली. यावर सदर घटकांना शासनाच्या योजनांचे फायदे घेण्याचे असल्याने उद्योगाकरीता अकृषिक जमीन करणे आवश्यक असल्याचे सदस्य-सचिव यांनी सांगितले.

उपस्थित उद्योजकांनी सामायिक सुविधा योजना अंतर्गत लागणारे यंत्रसामुग्री व टेस्टींग फॅसिलिटी पुरविण्याची मागणी केली तसेच वाहतूक सुविधा करीता अनुदान उपलब्ध करून द्यावे. सदर उद्योजकांनी निर्यात वाढण्याच्या दृष्टीने निर्यात प्रशिक्षण केंद्र शासनामार्फत नाशिक जिल्ह्यात सुरू करावे अशीही मागणी केली.

निर्यातदार घटकांना बँकेमार्फत CGTMSE योजनेअंतर्गत लाभ सुलभरित्या होणेकरीता येणा-या अडचणी दूर करण्याबाबत शासनाने दखल घ्यावी अशी मागणी केली.

नाशिक जिल्ह्यात द्राक्षाचे उत्पादन अधिक प्रमाणात होत असून त्या तुलनेत स्टोरेज कन्टेनर / ट्रान्सपोर्टेशन कन्टेनर उपलब्ध होत नाहीत, त्याचा परिणाम निर्यातीवर होत आहे. त्याकरीता कन्टेनरच्या संख्येत वाढ करण्यात यावी, तसेच जिल्ह्यामध्ये ड्राय पोर्ट ची आवश्यकता असल्याने त्याचा फायदा जवळच्या तालुक्यातील उत्पादकांना होईल अशी मागणी उपस्थित निर्यातदार उद्योजकांनी केली.

उपस्थित सभासदांना नाशिक जिल्ह्याचा निर्यात आराखडा बाबत माहितीचे सादरीकरण करण्यात करण्यात आले सदरील आराखडयास मान्यता देण्यात आली. तसेच महाराष्ट्र राज्याचे निर्यात धोरण-२०२३ बाबत माहिती देण्यात आली.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.

मा.जिल्हाधिकारी
नाशिक.